**नियमीत दिवाणी दावा क्र.१००/२०२३ मधील निशाणी १४ वरील आदेश**

**शिवलाल वि. विजय**

**CNR NO.MHWS08001469-2023**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीतील परिस्थिती **जैसे थे** ठेवण्यासाठी दिलेला आहे. अर्ज व त्यावरील प्रतीवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, सदर प्रकरण वादीने प्रतीवादी विरूद्ध कायम स्वरुपी मनाई हुकुम मिळणेबाबत दाखल केले आहे. प्रतिवादींनी मागील तारखेवर हजर झाले असुन अद्याप पावेतो लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे, प्रकरणातील निशानी ५ वर सुनावणी होवुन आदेश होण्यास वेळ लागत आहे. याचा फायदा घेवुन प्रतिवादीने वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्नात आहे. त्यामुळे, वादीचे कधीही न भरून निघणारे नुकसान होईल. त्यामुळे, **जैसे थे** आदेश पारीत होण्याची विनंती केली.

३. प्रतीवादीच्या विधीज्ञाने सदर अर्जावरती निशानी १५ वर म्हणणे दिले. सदर अर्जास त्यांनी विरोध दर्शविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, वाद मिळकत ही राहते घर/जागा असुन ति नाश होणारी, खराब होणारी वस्तु नाही. त्यामुळे, दाव्यात कोणतीही गरज नाही. वादीच्या शेजारी प्रतिवादींची घरे आहेत, ते त्यांच्या कुटुंबासह राहतात. प्रतिवादीला एकच घर आहे. प्रतिवादी क्र.२ चे पती मयत आहेत व ती एक वयोवृध्द स्त्री आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादी त्याचा प्रतिवादीविरूध्द गैर वापर करू शकतात. निशाणी ५ चा अर्ज निकाली काढण्याकरीता ३० दिवसांचा कालावधी बाकी आहे. सबब, सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादी हे दिनांक १३.१०.२०२३ रोजी सदर प्रकरणात हजर झाले असुन त्यांनी आज रोजी लेखी जबाब व निशाणी ५ ला उत्तर देण्यासाठी वेळ मिळणेबाबत निशानी १३ प्रमाणे अर्ज सादर केला आहे. तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज प्रलंबीत असुन गुणदोषावर सदरचा अर्ज निर्णीत होणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जात मागणी केलेली उपाययोजना ही तात्पुरत्या मनाई हुकुमासारखीच आहे. अशा परिस्थितीत निशानी ५ वर सुनावणी होणे गरजेचे आहे कारण वस्तुस्थिती

समोर येणार आहे. त्यामुळे, मनाई हुकुमासारखाच अर्ज हा गुणवत्तेवर निकाली निघू शकतो. सबब खालील आदेश पारीत.

**आदेश**

१. निशाणी १४ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.
२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

सहि

दि. १७.१०.२०२३

(श्रीमती पी.एम. कांबळे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर,
रिसोड.

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr.clerk | :- | P.P. Sonune, Jr. Clerk |
| Court | :- | 2nd Jt. Civil Court,J.D.,Risod. |
| Date | :- | 17/10/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 17/10/2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 17/10/2023 |